दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार २३ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २५० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# शिव, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारांची देशात लाट आलीय- जयंत पाटील

## बजरंग सोनवणेंचा विजय कोणी रोखू शकत नाही, राज्यात महाविकास आघाडी ३२ ते ३५ जागा जिंकणार

## मतदार संघाचे प्रारब्ध ठरविण्याचा अधिकार कुणी दिला ; जिल्ह्यातील जनताच प्रारब्ध ठरविणारा - बजरंग सोनवणे

**वादळवार्ता/बीड**

देशात शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांचे विचार आणि संविधान वाचविण्यासाठी प्रचंड प्रमाणात लाट आलेली आहे. महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीच्या ३२ ते ३५ जागा निवडून येण्याचा ठाम विश्वास राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बीड येथे बजरंग सोनवणे यांचा उमेदवारी अर्ज भरल्यानंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधताना व्यक्त केला.

तर लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी थेट पालकमंत्राना आव्हान देत म्हटले की, पालकमंत्री महोदय तुम्ही आमची औकात काढू नका. आमची औकात काय आहे? हे आम्ही दाखवून दिलेले आहे. ज्या स्व. मुंडे साहेबांनी राज्यातील २५ साखर कारखाने यशस्वीपणे चालविले. ते सर्व तुम्ही बहीण भावाने बंद केले. त्यांनी काढलेले तीन साखर कारखाने देखील बंद पाडले. तर मी एक सामान्य शेतकऱ्याच्या घरात जन्मलेल्या सामान्य व्यक्ती दोन कारखाने यशस्वीपणे चालवीत असून मराठवाड्यात विक्रमी भाव देत आहे. ही आमची औकात आहे. तसेच भाजप सरकार सत्तेचा गैरवापर करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच मी मॅनेज नसून मरते दम तक शरद पवार साहेबांच्या विचारांचा पाईक राहील असे अभिवचन त्यांनी दिले.

या कार्यक्रमाला खा रजनीताई पाटील राष्ट्रवादीचे पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे , शिवसेना उबाठा किशोर पोतदार , राष्ट्रवादी युवक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष महेबूब शेख , जिल्हाध्यक्ष तथा आमदार संदीप क्षीरसागर , माजी आमदार पृथ्वीराज साठे, बबन गित्ते, फुलचंद कराड, नरेंद्र काळे, संगीता चव्हाण, अजिंक्य चांदणे, धम्मपाल कांडेकर, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार बदामराव पंडित, ईश्वर मुंडे, रत्नाकर शिंदे, परमेश्वर सातपुते, भाई मोहन गुंड, ॲड. गोले, माजी आमदार उषाताई दराडे, सुदामती गुट्टे, शिवराज बांगर, सुशीला मोराळे, पूजा मोरे, विजय साळवे, दीपक केदार, कॉम्रेड नामदेव चव्हाण, गणेश वरेकर, माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार सुनील धांडे, माजी आमदार सिराज देशमुख, अजय बुरांडे , हेमा पिंपळे , शिवाजीराव कांबळे, दादासाहेब मुंडे यांच्यासह इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांचे नेते उपस्थित होते.

२२ एप्रिल रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांचा उमेदवारी अर्ज राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा. रजनीताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केला. त्यानंतर राष्ट्रवादी भवन या पक्ष कार्यालयात कार्यकर्त्याची संवाद साधताना जयंत पाटील म्हणाले की, राज्यात महाविकास आघाडीच्या ३२ ते ३५ जागा निवडून येणार आहेत. देशांमध्ये महाविकास आघाडीच्या प्रचंड मोठ्या सभा होत आहेत. लोकांचं मत आता महाविकासकडे वळत आहे. आमच्याकडे नेते जास्त नाहीत. पण जनता मात्र प्रचंड प्रमाणात आमच्याकडे आहे. याची दक्षता घेण्याचा सल्ला देखील त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. तर बजरंग बप्पा सोनवणे हे बीड लोकसभेला निवडून येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. सलग पंधरा वर्षे भाजपची सत्ता असताना ते जिल्ह्याचा विकास करू शकले नाहीत. त्यांची अकृतीशीलता असून भाजप जिल्ह्यातील जनतेने दिलेल्या जबाबदारी पेलू शकले नसल्याचा आरोप त्यांनी केला. देशात संविधान वाचवायचे असेल आणि शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचार आणि संविधान वाचविण्यासाठी या देशात भाजप विरोधी लाट निर्माण झाली आहे. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर जीएसटीने शेतकरी शेतमजूर आणि सामान्य जनता हैराण झालेली असून त्यातून महाविकास मुक्त करू शकते. असा विश्वास व्यक्त केला. आत्ता पर्यंत देशात कॉंग्रेस आणि समविचारी पक्षाने केलेला विकास याला शून्य ठरविण्याचे कटकारस्थान मोदी कटकारस्थान करीत असल्याचा आरोप त्यांनी भाजपवर केला. तसेच जिल्हा सुजलाम सुफलाम करण्याचे अभिवचन देखील त्यांनी यावेळी दिले. भाजपच्या नेत्यांनी टीकाटिपणी करण्यापेक्षा विकासाच्या मुद्द्यावर बोलावं असा देखील सल्ला त्यांनी भाजपला दिला.

यावेळी बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, आता नेते नव्हे तर जनता आमच्या सोबत असून भाजप सरकार हे सत्तेच्या पाचपट सत्तेचा गैरवापर करीत आहे. निवडणुक ही गैरविश्वासाच्या मुद्द्यावर लढविली जात असून मी मॅनेज असल्याचा माझ्यावर आरोप होतोय. परंतु मी मरते दम तक शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचाराचा पाईक असून मी मॅनेज होणार नाही. असाही त्यांनी कार्यकर्त्यांना विश्वास दिला. त्याच बरोबर पालकमंत्र्याचा विधानाचा समाचार घेताना ते म्हणाले की, मी जरूर माझी छाती पडून धनंजय मुंडे आणि अजित दादा हे छातीत असल्याचे म्हणालो परंतु आणखी चार महिन्या नंतर निवडणूक संपल्या नंतर ते दोघेही शरदचंद्र पवार यांच्या पक्षात येतील. परंतु त्यांना पक्षात घ्यायचे किंवा नाही हे आम्ही ठरवू. तसेच अहमदनगर ते परळी रेल्वे मार्ग विषयी बोलताना त्यांनी सांगितले की हा रेल्वे मार्ग २५६ किलोमीटर पासून १५ वर्षां मध्ये केवळ ९९ किलोमीटरचे काम पूर्ण झालेलं आहे. हा रेल्वे मार्ग पूर्ण होण्यासाठी आणखी २५ वर्षे लागतील. म्हणजे किमान दोन पिढ्या तरी हा रेल्वे मार्ग पूर्ण होणार नाही. परंतु मी निवडून आल्या नंतर अवघ्या दोन वर्षांमध्ये ही काम पूर्णत्वाकडे घेऊन जाईन. त्याच बरोबर राष्ट्रीय महामार्गाची काम १० वर्षांत तरी पूर्ण होऊ शकलेले नाही. या रस्त्याच्या अर्धवट कामामुळे २ हजार लोकांची जीव जाऊन अनेकजण जखमी व जायबंदी झालेले आहेत. ज्या पंकजाताई म्हणायच्या की, पुढच्या लोकसभेची निवडणूकीचा अर्ज भरताना मी रेल्वेने फॉर्म भरायला येईन. त्या खरच रेल्वेने उमेदवारी अर्ज दाखल करायला येणार का? असाही प्रश्न त्यांनी पंकजाताई मुंडे यांचे नाव न घेता केला आणि ज्या पंकजाताई म्हणत होते की मी प्रीतमताई चे ताट ओढून घेणार नाही. मग त्यांनी सख्ख्या बहिणीचं ताट का ओढून घेतलं? यासाठी त्यांच्यावर कोणाचा दबाव होता? याचे उत्तर त्यांनी देण्याची मागणी केली. पालकमंत्र्या विषयी बोलताना म्हणाले की, पालकमंत्री जरा सबुरीने घ्या. आमची औकात काढू नका. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांनी राज्यातील २६ साखर कारखाने चालवले आणि तीन स्वतः काढले. ते कारखाने बंद करण्याचे पाप या मुंडे कुटुंबीयांनी केले असून मी एक सर्वसामान्य शेतकरी कुटुंबद्दल आहे. तरी मी दोन कारखाने यशस्वीपणे चालू मराठवाड्यात सर्वाधिक भाव देत आहे. तसेच जिल्ह्यातील जनतेचा प्रारब्ध ठरविणारा कोणी माईचा लाल जन्माला आलेला नाही. मग तुम्ही प्रारब्ध ठरविणारे कोण ? असाही जळजळ सवाल त्यांनी केला. तसेच टीका करायचे असेल तर होऊन जाऊ द्या. घोडा मैदान जवळ आहे. तसेच मी कशाची शेती करतो? त्याचा तपास करू असं म्हणणाऱ्या पालकमंत्र्यांना जवाब देत बजरंग बप्पा म्हणाले की माझ्या शेतात काय पिकतं ? आता पर्यंत तुम्ही कसं बघितलं नाही. दुर्बीण लावून बघा. आम्ही पण बघतो. तुम्ही बहिण भाऊ एक झालात पण कार्यकर्त्यांनी काय करायचं ? तसेच मतदारसंघात मी उसाचे राजकारण कधी करणार नाही. असाही शेतकऱ्यांना विश्वास त्यांनी यावेळी दिला.




## कोण काय म्हणाले ?

**खा. रजनीताई पाटील** - ही लढाई हि आता विचारधारेची लढाई आहे. त्यामुळे मतदान खूप विचारपूर्वक करावे लागणार आहे. बजरंग बप्पा सोनवणे हे निवडून आल्या नंतर आम्ही दोघे समविचारी पक्षाचे असल्याने जिल्ह्याचा विकास पूर्ण ताकदीनिशी करू. तसेच बजरंग सोनवणे हे आपले भाऊ आहेत.

**दीपक भाई केदार :-** आम्ही संविधान वाचविण्यासाठी महाविकास आघाडी सोबत आहोत जर आम्ही सोबत राहिलो नाही तर भाजप संविधान संपवले.

**फुलचंद कराड** - पंकजा मुंडे यांनी प्रीतम मुंडे यांचे खासदारकीच्या उमेदवारीचे ताट स्वतः ओढून घेतलं आहे. त्यांनी त्यांचा शब्द पाळा नाही आणि ईडीच्या भीतीपोटी त्यांनी लोकसभेची उमेदवारी स्वीकारली आहे.

**ॲड. हेमा पिंपळे** - शरदचंद्र पवार यांनी शेतकऱ्यांसाठी काम केलेले असून शेतकरी पुत्र बजरंग बप्पा यांना मतदार संघाचा विकासाचा अनुशेष भरण्यासाठी लोकसभेला निवडून द्या तसेच बेटी बचाव बेटी पढाव म्हणणार आहे भाजप महिलांनी महिलांकडून अत्याचार करीत आहेत.

**महेबुब शेख** - भाजप पक्ष म्हणजे मलिदा गँग आहे आणि आमची लढाई बेरोजगारी व भ्रष्टाचार यांच्या विरोधात आम्ही लढत आहोत. तसेच पंकजा मुंडे यांचे कार्यकर्ते म्हणतात की ताईंना मंत्रीपद करत देण्यासाठी लढत आहेत; परंतु महानगरपालिकेच्या पडलेले भागवत कराड यांना मंत्री पद दिले आणि रमेश आप्पा कराड यांना स्थानिक स्वराज्य संस्थेचे आमदार केलं. परंतु ताईंना कोणतं पद दिलं नाही. तसेच जे अधिकारी सत्तेचा दुरुपयोग करीत आहेत त्यांची व्याजा सहित वसुली केली जाईल. असा सज्जड इशारा महबूब शेख यांनी दिला

**कॉ. नामदेवराव चव्हाण** - पंतप्रधान मोदी आणि अमित शहा हे दिशाभूल करीत असून त्यांची दिशाभूल रोखण्याचे काम आपल्याला करायचे आहे. मोदी व शाहा यांच्या विचारला देशातून तडीपार करा.

**गणेश वरेकर** - ज्यांनी पक्षाशी गद्दारी केली त्यांना आता कल गाडण्याचे वेळ आलेली आहे.

**माजी आमदार बदामराव पंडित** - ही निवडणूक जनतेने हातात घेतलेली असल्याने त्यांचा विजय कोणी रोखू शकत नाही.

# वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांना सर्वाधिक मताधिक्य देणार - विष्णू देवकते

**वादळवार्ता/बीड**

लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांना सर्वाधिक मताधिक्य देणार असल्याचे विष्णू देवकते यांनी सांगितले ते गेवराई तालुक्यातील रांजणी, भेंडटाकळी, गढी फाटा, सिरसदेवी येथील प्रचार दौऱ्यानिमित्त घेण्यात आलेल्या नागरिकांच्या बैठकीत बोलत होते

पुढे बोलताना देवकते म्हणाले की वंचित बहुजन आघाडी ने शोषित दलित,मुस्लिम, मराठा, धनगर, बांधवांच्या हितासाठी वेळोवेळी आंदोलन केलेले आहेत. ओबीसींचे राजकीय आरक्षण काढुन घेण्याचा प्रयत्न झाला त्यावेळेस फक्त बाळासाहेब आंबेडकर यांनीच आवाज उठवला.गरीब मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे हि भुमिका घेतली. कोर्टाने मान्यता दिलेल्या मुस्लिम समाजाच्या पाच टक्के आरक्षणाची अंमल बजावणी साठी वेळोवेळी आंदोलन केली.यामुळे मुस्लिम मराठा, धनगर, साळी, माळी, कोळी, वंजारी अठरापगड जाती मधील बहुजन मतदार वंचित बहुजन आघाडीच्या पाठीमागे उभा आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना सर्वत्र वाढता पाठिंबा मिळत आहे. केंद्रातील व राज्यातील सरकारने प्रत्येक व्यक्तीला फक्त त्रास आणि त्रास देण्याचे काम केले असल्यामुळे लोक केंद्रातील मोदी सरकारला, राज्यातील शिंदे सरकारला पूर्णता कंटाळलेले आहेत त्यातच त्यांनी पक्ष फोड करून भ्रष्ट लोकांना आपल्या पक्षात स्थान दिल्यामुळे महायुती, आणि महाविकास आघाडी हे दोन्ही सारखेच पक्ष आहेत यांना फक्त सत्ता हवी असते जनतेच्या प्रश्नांशी यांना काहीच देणे घेणे नाही. त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत सर्व मतदारांनी बहुजन वंचित आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून गोरगरीब दिन दलित बहुजन यांचा आवाज संसदेत पाठवण्यासाठी प्रचंड मताधिक्य देऊन विजय करावे असे आव्हानही विष्णू देवकते यांनी केले आहे यावेळी रांजणी, भेंड टाकळी, गढी, सिरसदेवी आधी गावातील मतदारांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांना गेवराई तालुक्यातून सर्वाधिक मताधिक्य देणार असल्याचे सांगितले वंचित चे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या सोबत इंजि.विष्णू देवकते, पुरुषोत्तम वीर, बालाजी जगतकर, पप्पू गायकवाड किरण वाघमारे,किशोर भोले, हे उपस्थित होते. तर रांजणी येथे मधुकर ससाने, श्रीपती ससाने, सनी ससाने, सिद्धार्थ ससाणे, बाळासाहेब ससाणे, वसंत वाघमारे, मारुती कांबळे, सिरसदेवी येथिल बाळासाहेब पाटील,दादा वक्ते, अखिलभाई शेख, सचिन आडागळे, भागवत वक्ते, समाधान वक्ते, राहुल खरात, चत्रभुज वक्ते, रामेश्वर चव्हाण, शाहिद पठाण, सागर वक्ते, भेड टाकळी येथील पप्पू वाव्हळ, श्रीराम उबाळे,सचिन वाव्हळ, भैय्यासाहेब वाव्हळ,कांता गायके, मुख्तार शेख, शिवाजी उबाळे,रामेश्वर फुळझळके,निपाने शहादेव, अभिषेक वाव्हळ, राहुल त्रिभुवन,मिलिंद तायड,कैलास वाव्हळ, महेबुब शेख पृथ्वीराज वाव्हळ,अजय वाव्हळ,बाबुराव आबुज, बाळु वाव्हळ आदी उपस्थित होते.

संपादकीय

## विठ्ठल नामातच मातीत मूल तुडविले!

यातील आख्यायिकेच्या मागे चमत्काराचा भाग असलेला दिसून येतो. संतांच्या चरित्रात असे अनेकविध चैतन्याचे चमत्कार वर्णिलेले आहेत. चमत्काराचे चैतन्य असते. पण बऱ्याचदा समृद्ध समाजाला अशा चमत्कारातून चेतना मिळण्याऐवजी त्यांच्या ठिकाणी अंधश्रद्धा बळावताना दिसते. संतांचे जीवनदर्शन घडविताना सुद्धा केवळ चमत्कार हे त्यांचे साध्य नव्हते तर साधन होते, याचे भान राखावे. म्हणून फक्त तो त्यांच्या जीवनातील एक चमत्काराचा भाग समजावा. फार तर त्याचा सरळ सरळ अर्थ घेणे योग्य नाही. याबाबत असे म्हणता येईल की माधवबुवा धार्मिक व सहिष्णुवृत्तीचे होते. काळेश्वरावर त्यांची निस्सीम श्रद्धा व भक्ती होती. सात मुले एका मागोमाग गेली परंतु आठवा मुलगा गोरोबा जिवंत राहिला. म्हणून माधवबुवांना तो आपल्या श्रध्देचा, भक्तीचा, महिमा वाटला. यावरुन एवढाच तर्क करता येतो किंवा अंदाज बांधता येतो की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गारोबांचा जन्म झाला आहे. सदर लेख श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांच्या शब्दांत जरूर वाचा... संपादक.

माधवबुवांना आठ मुले झाली, पण ती जगत नव्हती. त्यांनी आपली सर्व मुले काळेश्वराजवळील स्मशानातील गोरीत पुरली होती. ती सर्व मुले जिवंत कशी झाली? यासंबंधी एक आख्यायिका संत गोरोबा काका चरित्रामध्ये महादेव बाळाजी कुंभार यांनी सांगितली आहे. ते आपल्या चरित्रामध्ये म्हणतात, की श्री माधवबुवा तेर येथील काळेश्वराची उपासना करीत होते. पुढे कालांतराने परमात्मा पांडुरंग ब्राह्मणाचा वेष घेऊन त्यांचे घरी आले. तेव्हा खिन्न मुद्रा पाहून देवाने त्यांना विचारले, की दुःखी का? माधवबुवांनी सांगितले, की आपली आठही मुले देवाने नेली. नंतर देवाने आठ मुलांना जेथे मूठमाती दिली, ती जागा दाखविण्यास सागितले. माधवबुवांनी काळेश्वर जवळील स्मशानात नेले व देवास आठही मुले पुरलेली जागा दाखविली. देवाने सर्व मुलांची प्रेते उकरण्यास सांगितली. बुवांनी त्याप्रमाणेच केले. देवाने पाहिले व सात मुलांना आपल्या हाताच्या स्पर्शाने जिवंत करून त्यांना स्वर्गात पाठविले. नंतर आठवा मुलगा जिवंत केला. तोही स्वर्गाच्या मार्गाने निघाला. परंतु देवाने त्यास जाऊ दिले नाही. भगवंताने त्याला आपल्या हातात घेऊन माधवबुवा व रखुमाईच्या स्वाधीन केले. त्यास गोरीतून काढले, म्हणून देवाने त्याचे नाव गोरोबा ठेवले. संतश्रेष्ठ गोरोबाकाका कुंभार हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत होते. ते संत नामदेव व संत ज्ञानेश्वरांचे समकालीन मानले जातात. तज्ज्ञांच्या मते शा.श. ११८९ अर्थात इ.स.१२६७ साली त्यांचा जन्म झाला असावा. त्यांनी अनेक अभंग लिहिले आहेत. ते विठ्ठलाचे- पांडुरंगाचे मोठे भक्त होते. तेर नगरीत गोरोबांच्या घराण्याची परंपरा धार्मिक व सदाचारी वृत्तीची होती. तेथील काळेश्वर या ग्रामदैवतांचे त्यांचे घराणे उपासक होते. दोघे नवराबायको कुंभारकाम व काबाडकष्ट करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. सदाचारी, सच्छिल वृत्तीमुळे तेरगावात माधवबुवांना संत म्हणून गावकरी ओळखत होते.

गोरोबांच्या मनावर बालपणापासूनच भगवद्भक्तीचे संस्कार झाले होते. त्यांना लेखन-वाचन येत होते. संत ज्ञानदेव, संत नामदेव यांच्या पूर्वकाळात पंढरपूर हे शिव उपासकांचे- भक्तांचे केंद्र होते. अनेक शिवभक्त त्याठिकाणी आपली साधना करीत होते. ते भक्त, योगी, सिद्ध व साधकही होते. गोरोबाकाका जेव्हा जेव्हा पंढरपूरला जात, तेंव्हा त्यांना या सिद्ध पुरुषांचे दर्शन होई. त्यांच्या योगसाधनेचे त्यांना कौतुक व आकर्षण वाटे. असे करता करता गोरोबांचा प्रपंच आता परमार्थमय झाला होता. ते सकाळी उठून अंघोळ करून, देवाची पूजा करत. नंतर नामस्मरण करावे, ध्यानात पांडुरंगाचे रूप साठवून त्याला मनी-मानसी मुरवून घ्यावे आणि मग न्याहारी करून कामाला लागावे, असा त्यांचा दिनक्रम असे. दुपारचे जेवण झाल्यावर गोरोबा घराच्या ओसरीवरच्या खांबाला टेकून देवाचे नामस्मरण करीत, अभंग म्हणत विश्रांती घेत. त्यामुळे त्यांच्या चित्ताला समाधान मिळत असे. पुन्हा लगेच मोठ्या जोमाने कामाला लागत. दिवस मावळल्यानंतर हातपाय धुऊन पुन्हा घराच्या ओसरीवर एकतारीवर चिपळ्याच्या साथीने भजन सुरू होई आणि रात्रीच्या जेवण्याचेवेळी ते थांबे. रात्रीचे जेवण झाल्यानंतर पुन्हा भजन सुरु होई. शेजारपाजारची मंडळीही त्यात सामील होत असत. नंतर परमेश्वराचे नामस्मरण करीतच झोपी जात. संतशिरोमणी गोरोबाकाका पायाने चिखल तुडवित असत. त्यांचे सर्व ध्यान पांडुरंगचरणी लागलेले असे. ते जरी संसारात दंग होते; तरी विठ्ठलभक्ती आणि विठ्ठलाचे नामस्मरण हेच त्यांचे जीवन झाले होते. पांडुरंगाच्या नामस्मरणात ते आपली तहानभूक हरपून जात. स्वदेहाचे भानच त्यांना राहत नसे. संत नामदेवजी महाराज गोरोबा काकांच्या या तन्मयवृत्तीबद्दल लिहितात-

# आणि देशांत पंचायत राज सुरू झाले!

(राष्ट्रीय पंचायत राज दिन.)

पंचायत राज व्यवस्था स्वीकारणारे महाराष्ट्र हे देशातील ९वे राज्य आहे. महाराष्ट्राने वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वात पंचायत राज व्यवस्था स्वीकारण्यासाठी समिती गठीत केली होती. त्यानंतर दि.१ मे १९६२ला सरकारने महाराष्ट्र राज्यात पंचायत राज व्यवस्था लागू केली. त्यानुसार वसंतराव नाईक समितीच्या शिफारसीवरुन महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ तयार करण्यात आला. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर ज्ञानवर्धक लेख... संपादक.

भारत देशात पंचायत राज व्यवस्था कार्यरत आहे. त्यामुळे देशातील अंतर्गत कारभार पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून चालवण्यात येतो. त्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद ही सार्वभौम मानली जाते. या पंचायत राज व्यवस्थेतून ग्रामीण भागातील कारभार सुरु करण्यात येतो. त्यामुळे पंचायत राज व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय पंचायत राज दिन २४ एप्रिलला साजरा करण्यात येतो. काय आहे बरं, पंचायत राज दिनाचा इतिहास? लॉर्ड रिपन या इंग्रज अधिकाऱ्याला भारतीय पंचायत राज व्यवस्थेचा जनक मानले जाते. लॉर्ड रिपनने भारतात १२ मे १८८२ला स्थानिक स्वराज्य संस्था सुरू केल्या आहेत. त्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेला पंचायत राज हे नाव दिले. त्यानंतर दि.२४ एप्रिल १९९३ला ७३वी घटना दुरुस्ती करुन पंचायत राज व्यवस्था अधिकृत करण्यात आली. पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी राजस्थानातील नागौर जिल्ह्यातील बगदरी गावात दि.२ ऑक्टोबर १९५९ रोजी पहिल्यांदा पंचायत राज व्यवस्था सुरू केली. त्यानंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी दि.२४ एप्रिल २०१०ला राष्ट्रीय पंचायत राज दिनाची घोषणा केली. तेव्हापासून भारतात २४ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय पंचायत राज दिन म्हणून साजरा करण्यात येतो. भारतात लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्था सुरु केल्यानंतर ही व्यवस्था बळकट करण्यात आली. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २४ एप्रिल हा दिन राष्ट्रीय पंचायत राज दिन म्हणून जाहीर केला. महाराष्ट्र पंचायत राज व्यवस्था स्विकारणारे ९वे राज्य आहे. पहिल्यांदा राजस्थानने पंचायत राज व्यवस्था स्विकारली आहे. त्यानंतर आंध्रप्रदेशाने १ नोव्हेंबर १९५९ला पंचायत राज व्यवस्था स्विकारली आहे. तर महाराष्ट्राने पंचायत राज व्यवस्था लागू करण्यासाठी वसंतराव नाईक समिती १९६०ला नेमली होती. या समितीने आपला अहवाल १५ मार्च १९६१ला शासनाला सादर केला होता. दि.१ एप्रिल १९६१ला सरकारने हा अहवाल स्विकारला होता. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. त्यानंतर दि.१ मे १९६२ला सरकारने महाराष्ट्र राज्यात पंचायत राज व्यवस्था लागू केली. त्यानुसार वसंतराव नाईक समितीच्या शिफारसीवरुन महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ तयार करण्यात आला. पंचायत राज व्यवस्थेच्या मुळाचा शोध घ्यावयाचा झाल्यास भारतात अगदी प्राचीन काळापासून पंचायती अस्तित्वात असल्याचे दिसते. अर्थात आजच्या पंचायत राज पद्धतीपेक्षा त्याचे स्वरूप खूपच वेगळे होते. गावातील हुशार, अनुभवी, आदरणीय अशी पंचमंडळी असायची. गावातील चावडी सारख्या सार्वजनिक ठिकाणी रोज सकाळी ही मंडळी बसायची आणि गावातील लोकांच्या अडचणी समजावून घेऊन मार्गदर्शन करावयाची. गावामध्ये काही वाद, भांडणे झाल्यास त्यामध्ये लक्ष घालून सोडविणे, गावचा विकास होण्यासाठी योजना आखणे, गावाचा कारभार चालविणे, गावाचा कर गोळा करून राजाला खंड वसूली देणे इ.कामे ही पंचमंडळी पार पाडीत असत. गावात त्यांना फार मान होता. गावकरी त्यांच्या शब्दाबाहेर जात नसत.

मौर्यांच्या काळामध्ये तर त्यांना ग्रामशासनाचा अधिकार होता. व त्या दृष्टीने या पंचायती खूपच विकसित झालेल्या होत्या. सन ८०० ते १०००च्या दरम्यान बोल घराण्याच्या इतिहासातील एकल येथील चौदा शिळा खऱ्या ग्रामपंचायतीच्या निर्देशक आहेत. आजच्या ग्रामपंचायती करीत असलेली विविध गाव विकासाची कामे या ग्रामपंचायती त्या वेळी करीत होत्या. ग्रामपंचायतीची निवडणूक दरसाल होत असे व सर्व सभासद लोकनियुक्त असत. त्यांच्यावर सरकारी अधिकाऱ्यांची देखरेखीसाठी नेमणूक होई. ग्रामपंचायतीकडे स्वतःच्या निधी असायचा. न्यायनिवाडे ही पंचायत करी, फाशीची शिक्षा क्वचितच अंमलात येई. देवळात नंदादीप लावणे अगर पंचायतीस अमुक इतक्या गाई पुरविणे या गोष्टी शिक्षा म्हणून देत असत.

भारतात अनेक साम्राज्ये आली होती. बाहेरून आलेल्या मोगलांनी ही पद्धत स्विकारली. भारतासारख्या खंडप्राय खेडयापाड्यात विखुरलेल्या देशाला विकेंद्रित शासनाचीच जरुरी होती. त्यामुळेच ही पद्धत अनेक वर्षे टिकून होती. त्यातूनच खेडी स्वयंपूर्ण बनत होती. ग्रामीण कारागिर, कष्टकरी यांना पोट भरण्याकरीता व्यवसाय मिळत होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात ग्रामपंचायतीची पद्धत चोहीकडे चालू होती. तीच रयतेच्या सोयीची वाटल्यावरून महाराजांनी कायम ठेवली. रयतेला न्याय मिळवण्यासाठी लांब कुठे जावे लागू नये, म्हणून गावातील पंचांनीच फुकट न्याय द्यावा, हे अभिप्रेत होते. छत्रपतींच्या काळात ग्रामपंचायती पूर्वीप्रमाणे चालू होत्या. ब्रिटीशांच्या आगमनानंतर त्यांनी मात्र आपापल्या स्वार्थासाठी गावगाड्यांची चालू व्यवस्था मोडीत काढून तलाठी पोलीस पाटील यांच्यापासून ते कलेक्टर पर्यंत नोकरशाहीची फौज निर्माण केली. सन १८८२ साली लॉर्ड रिपनने मर्यादित स्वरुपात स्थानिक स्वराज संस्थेचा कार्यक्रम अंमलात आणला. परंतु आरोग्य आणि प्राथमिक सोयी सुविधा पुरतेच त्यांचे उद्दिष्ट मर्यादित होते. त्यामध्ये स्वराज्याचा मागमूसही नव्हता. याच काळात तालुका लोकल बोर्ड, जिल्हा लोकल बोर्ड व काही मोठ्या गावात ग्रामपंचायती स्थापन झाल्या. या स्थानिक स्वराज्य संस्था स्वातंत्र्य प्राप्ती नंतरही काही काळ चालू होत्या.

देशाच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात देशाच्या पुनुरुत्थापनाचा व नवनिर्माणाचा विचार सुरू झाला. त्यामध्ये गाव विकासाच्या दृष्टीने विचार होणे स्वाभाविक होते. महात्मा गांधींनी स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात खेड्याकडे जाण्याचा मार्ग दाखविला आणि ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली होती. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना नवा मुलभूत आणि व्यापक अर्थ मिळाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि घटना समितीची स्थापना झाली. स्वातंत्र्य लढ्यात लोकांनी उराशी बाळगलेल्या ध्येयात ग्राम स्वराज्य हे सूत्र होते. त्यामुळे देशाची घटना होत असताना ग्रामपंचायतीचा स्वतंत्र तिसरा स्तर असावा अशी सूचना मांडण्यात आली. त्या सूचनेला घटना समितीतील काही लोकांनी विरोध केला. भारतीय समाज व्यवस्था जाती व्यवस्थेच्या उतरंडीवरच आधारीत असल्यामुळे तथाकथित उच्च वर्गीय जातींना पंचायत व्यवस्थेत पंच म्हणून स्थान मिळत असे. तसेच गांवातील उच्च जातीय लोकच निर्णय घेण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावत असत. अशा रितीने या पूर्ण व्यवस्थेमध्ये स्त्रिया आणि तथा कथित खालच्या जातींना कोणतेही स्थान नव्हते. ही व्यवस्था समानतेवर आधारीत नाही असे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे होते. त्यामुळे त्यांचा या व्यवस्थेला विरोध होता. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या तिसऱ्या स्तराची व्यवस्था अंमलात येण्यासाठी काही काळ थांबावे लागेल, कारण ग्रामपंचायतीचा वापर समाजातील हित संबंधी व श्रीमंत लोक करून घेतील व सर्व सामान्य लोकांवर व दलीतांवर अन्याय होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. तरीसुद्धा घटना समितीने सामाजिक उद्दिष्ट म्हणून "राज्ये, ग्रामपंचायत संघटीत करतील व त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करण्यास आवश्यक अधिकार देतील" असे चाळीसाव्या मार्गदर्शक सूत्रात नमूद केले. बलवंतराय मेहता अभ्यास गटाने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिली पंचवार्षिक योजना अमलात आणली. शेतकऱ्यांचा आणि खेड्यांतील इतर लोकांचा विकास करून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली. लोकांचा सहभाग यामध्ये अपेक्षित होता पण या योजनेला म्हणावा तसा लोकसहभाग मिळाला नाही. या कामाची पाहणी करण्यासाठी नियोजन मंडळाने बलवंतराय मेहतांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट नेमला. या अभ्यास गटाने आपला अहवाल सन १९५७ साली सदर केला. त्यामध्ये पंचायत राज्याची संकल्पना दिशा आणि रचनेच्या दूरगामी व अमुलाग्र बदलासाठी शिफारशी करण्यात आल्या आणि प्रथमच लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पंचायत राज्याची संकल्पना मांडण्यात आली. राजस्थान सरकारने बलवंतराय समितीच्या सूचना विचारात घेऊन जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीची योजना आखली. दि.२ ऑक्टोबर १९५९ रोजी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते या योजनेचे उद्घाटन केले आणि देशांत पंचायत राज सुरु झाले, अशी घोषणा केली. त्यानंतर ही व्यवस्था पंचायत राज या नावाने लोकप्रिय झाली. पंचायत राज व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर वेगवेगळ्या समित्या वेळोवेळी स्थापन करण्यात आल्या. त्यात श्री.व्ही.टी.कृष्णम्माचारी यांच्या अध्यक्षतेखाली १९६० साली समिती नेमण्यात आली. या अभ्यासगटाने काही महत्वाच्या शिफारशी केल्या. कायदयाने ग्रामसभा प्रस्थापित कराव्या व त्यांच्या किमान दोन सभा व्हाव्यात ही महत्वाची शिफारस या अभ्यास गटाने केली. सन १९७७ साली अशोक मेहता समिती स्थापन करण्यात आली. प्रत्येक राज्यातील पंचायत राज व्यवस्था त्या त्या राज्याच्या परिस्थितीप्रमाणे वेगवेगळी असू शकेल. आवश्यक वाटल्यास घटनेत दुरुस्ती करून पंचायत राज व्दारे लोकशाही विकेंद्रीकरण झाले पाहिजे असे मत या समितीने मांडले. सन १९८५ साली नियोजन मंडळाने ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम परिणामकारक रितीने राबविला जावा म्हणून श्री. जी.व्ही.के.राव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीनेही लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असावा म्हणून पंचायत राज व्यवस्थेला महात्वाचे स्थान असावे, अशी शिफारस केली.

महाराष्ट्र शासनानेही पंचायत राज व्यवस्थेच्या यशस्वी परिणामकारकतेसाठी वेळोवेळी अभ्यासगट व समित्यांची स्थापना केली. एस.जी.बर्वे समिती १९६८, बोगिरवार समिती १९७०, मंत्रिमंडळाची उपसमिती १९८०, आणि पंचायत राज व्यवस्थेचे मुल्यमापन करण्यासाठी १९८४ साली प्राचार्य पी.बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने आपला अहवाल १९८६ साली सादर केला. ही सर्वात अलिकडील समिती असून त्यांच्या शिफारशींच्या आधारे राज्यशासन वेळोवेळी विचार करून दुरुस्त्या करीत आहे.

एल.एम.सिंघवी समिती सन १९८४च्या अखेरीस राजीव गांधी यांनी देशाच्या पंतप्रधान पदाची सूत्रे स्विकारली. त्यांच्या सरकारने पंचायत राज्य संस्थेला मजबूती प्रदान करण्याच्या उद्देशाने सन १९८६च्या जून महिन्यात एल.एम.सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली "लोकशाही आणि विकास कामी पंचायतीचे पुर्नजीवन करण्यासाठी समिती" नियुक्त केली. पंचायत राज संस्थांची सध्याची स्थिती त्यांची आत्तापर्यंतची वाटचाल आणि विकास कार्यातील त्यांची भूमिका इत्यादीचे मूल्यमापन करण्याची तसेच ग्रामीण विकास व राष्ट्रबांधणीच्या कार्यात पंचायत राज्य संस्थांना भरीव योगदान कसे करता येईल याबाबत उपाय सुचविण्याची जबाबदारी सिंघवी समितीवर सोपविण्यात आली होती. एल.एम.सिंघवी समितीच्या बऱ्याचशा शिफारशी यापुर्वीच्या काही समित्यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणेच आहेत. तथापि सिंघवी समितीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण शिफारस केली ती म्हणजे "पंचायत राज संस्थांना किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक मान्यता व संरक्षण देण्यात यावे. त्याकरीता भारतीय राज्य घटनेत एक नवे प्रकरण समाविष्ट करण्यात यावे." सिंघवी समितीची ही शिफारस अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण मानावी लागेल. भारतात पंचायत राज्याची स्थापना झाल्यानंतर राजकिय नेत्यांनी व राज्यकर्त्यांनी ग्रामीण पुर्नरचनेच्या तसेच ग्रामीण विकासाच्या कार्यात पंचायत राज संस्था महत्त्वाची भूमिका बजावतील म्हणून त्यांना सक्षम बनविण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत, अशा अर्थाचे मत प्रदर्शन केले. ७३वी घटना दुरुस्ती करण्यामागे सिंघवी समितीच्या अहवालाचे फार मोठे योगदान आहे, असे म्हटल्यास त्यात वावगे काहीच नाही!!! पंचायत राज दिनानिमित्त सर्व भारतीय बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी,**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप-**

# अंबाजोगाईत चाललयं तरी काय ?

# दोन गटात तुफान राडा, १६ जणांवर गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

मराठवाड्यातील शांतताप्रिय शहर म्हणून अंबाजोगाई शहराची ओळख आहे पण ही ओळख जवळपास पुसून गेली असून शहरात दररोज कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्या घटना सर्रास घडत आहेत काल तर शहरात दोन गटात तुफान राडा झाला. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली पाटील आणि 'स्वाराती' रुग्णालयात घडलेल्या या सिनेमा स्टाईल राड्याच्या घटनेमुळे अंबाजोगाईत चाललयं तरी काय अशी भावना सर्वसामान्य नागरिक व्यक्त करित आहेत अंबाजोगाई शहरातील पाटील चौक परिसरात बच्चे कंपनीच्या मनोरंजनासाठी आनंद मेला' आला आहे. त्यामुळे सहाजिकच या परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी पहायला मिळत आहे. गर्दीमुळे गाडी लावण्याच्या कारणावरून सदर बाजार आणि बाराभाई गल्लीतील युवकांच्या दोन गटात सांयकाळी तुफान हाणामारी या ठिकाणी झाली त्यामुळे 'आनंद मेला' चा आनंद घेण्यासाठी आलेल्या बच्चे कंपनी आणि त्यांच्या पालकांची चांगलीच धांदल उडाली. हाणामारीची तीव्रता लक्षात घेऊन पालकांनी आणि बच्चे कंपनीने आपापल्या घरचा रस्ता धरला हाणामारीची घटना इथेच न थांबता परत 'स्वाराती' रुग्णालयाच्या कॅज्युअलटीमध्ये घडली याच हाणामारी करणाऱ्या दोन गटाने तिथेही गोंधळ घालत राडा केला या घटनेचे व्हिडिओ सध्या सोशलमिडीयावर तुफान व्हायरल झाले आहेत दरम्यान 'स्वाराती' रुग्णालयात सुरक्षा रक्षकांनी कडक पावले उचलीत गोंधळ घालणाऱ्यांचा चांगलाच समाचार घेतला. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आली, अशी माहिती मिळाली आहे दरम्यान, या घटनेमुळे अंबाजोगाई शहराची पुढील वाटचाल कशी राहणार याची चाहूल लागली आहे. अंबाजोगाई शहरात काल घडलेल्या या घटनेला पोलीसांनी गांभीर्याने घेतले असून शहर पोलीस ठाण्यात १६ जणांवर कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास अंबाजोगाई शहर पोलीस करित आहेत अंबाजोगाई शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असून अंबाजोगाईकरांनीही आत्मचिंतन करण्याची गरज आहे तरच अंबाजोगाईतील सर्वसामान्य माणूस मोकळा श्वास घेऊ शकेल

## अनिरुध्दाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट उरणतर्फे रक्तदान.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

अनिरुद्धाज अँकडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट उरण अंतर्गत सदगुरु श्री अनिरुद्ध समर्पण पथक उरण तालुका सहयोगाने रविवार दि २१ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९ सायंकाळी ४:३० या वेळेत उरण नगरपरिषद शाळा क्र.१, पेंशनर पार्क समोर, उरण शहर येथे भव्यदिव्य असे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. राज्यात दरवर्षी होणारा रक्ताचा तुटवडा व रक्ता अभावी होणारे मृत्यूचे वाढते प्रमाण लक्षात घेता दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रात अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. दरवर्षी प्रमाणेही उरण मध्ये यावर्षीही रक्तदान शिबीराला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. एकूण २०१ रक्तदाते रक्तदान करायला आले त्यामधून १५३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सदर रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी सद्गुरु श्री अनिरुध्द समर्पण पथक उरण तालुका केंद्रांच्या सर्व श्रद्धावान यांनी विशेष मेहनत घेतली. या रक्तदानामुळे रक्ता अभावी होणारे मृत्यूचे प्रमाण कमी होणार आहे. आपतकालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत रक्त उपलब्ध होणार आहे. या रक्तदानामुळे अनेकांचे यामूळे जीव वाचणार आहेत. त्यामूळे अनिरुद्धाज अकॅडमी मॉक डिझास्टर मॅनेजमेंट,सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र उरण तालुका सर्व उपासना केंद्राने आयोजित केलेला रक्तदान शिबीराचा कार्यक्रम सर्वांसाठी निश्चितच प्रेरणादायी व आदर्श ठरला आहे.







## नवीन शेवा उरण येथे सुमारे १०० निरंकारी भक्तांचे उत्स्फूर्त रक्तदान.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

रक्तदान शिबिरांची श्रृंखला कायम ठेवत संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशनच्या वतीने रविवार दि. २१ एप्रिल २०२४ रोजी नवीन शेवा , उरण येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिरात सुमारे १०० निरंकारी भक्तांनी मानवीयतेच्या भावनेतून मोठ्या उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. संत निरंकारी रक्तपेढी, विले पार्ले मार्फत रक्त संकलन करण्यात आले. निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य शिकवणूकीमुळे निरंकारी भक्तगणांमध्ये मानव सेवेची भावना दृढमूल झालेली असून ते रक्तदाना व्यतिरिक्त इतर अनेक सामाजिक सेवांमध्ये निरंतर आपले योगदान देत आहेत. या शिबिरात देखील सुमारे १५० भक्तांनी रक्तदानासाठी आपली नावे नोंदवली होती यावरुन सद्गुरु माताजींच्या शिकवणूकीचा प्रभाव दिसून येतो.




संत निरंकारी मंडळाचे क्षेत्रीय संचालक अशोक केरेकरजी यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी मंडळाचे स्थानिक सेक्टर संयोजक दत्ताराम पाटीलजी तसेच सेक्टर मधील सर्व ब्रॉंच चे मुखी, सेवादल, संचालक व अधिकारी उपस्थित होते. नवी मुंबई उरण विभागातून मनोहर गजानन भोईर (शिवसेना, जिल्हा प्रमुख - रायगड) तसेच सोनल निलेश घरत (सरपंच, नवीन शेवा) आदि मान्यवर व्यक्तींनी या शिबिराला सदिच्छा भेट दिली. संत निरंकारी मंडळाचे उरण सिटी ब्राँचचे मुखी समीर सहदेव पाटील यांनी स्थानिक सेवादल युनिट व संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे स्वयंसेवक यांच्या सहकार्याने या शिबिराचे यशस्वी आयोजन केले गेले.

## केनवडेत संजयबाबा घाटगेंचा वाढदिवस उत्साहात

### विविध स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव

**वादळवार्ता/कुडूत्री**

कागलचे माजी आमदार , अन्नपुर्णाचे संस्थापक चेअरमन संजयबाबा घाटगे यांचा वाढदिवस जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. केनवडे ता.कागल येथे अन्नपुर्णा शुगर कारखाना कार्यस्थळावर संजयबाबा घाटगे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्ह्याच्या विविध भागातून त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्त्यांची रिघ लावली होती.

पालकमंत्री हसन मुश्रीफ, छत्रपती शाहू महाराज,श्रीमंत मालोजीराजे छत्रपती, जिल्हा परिषदेचे ज्येष्ठ सदस्य अरूणराव इंगवले – सरकार ,शिवसेना (उबाठा) चे अरूणभाई दुधवडकर, संजय पवार यांनी दुरध्वनीद्वारे संजयबाबा घाटगे यांना शुभेच्छा दिल्या तर बिद्रीचे चेअरमन के.पी.पाटील,संताजी घोरपडे कारखान्याचे चेअरमन नाविद मुश्रीफ, केडीसीसी चे



संचालक भैया माने, गोकुळचे संचालक युवराज पाटील,रणवीर विजयसिंह मोरे, गोकुळचे संचालक अंबरिषसिंह घाटगे, बिद्रीचे संचालक, उपमहाराष्ट्र केसरी पै.रविंद्र पाटील,आप्पासो पाटील,रणजित मुडूकशिवाले, फतेसिंह भोसले- पाटील,माजी सरपंच,दत्ता पाटील, माजी.जि.प. सदस्य शिवानंद माळी,नानासो कांबळे,शिवसिंह घाटगे, शिवगोंड पाटील,संभाजी भोकरे, धनराज घाटगे,के.के. पाटील,शामराव पोवार,साताप्पा तांबेकर,उमाजी पाटील, सुभाष गडकरी,विष्णूपंत गायकवाड,संजय भोसले यांनी प्रत्यक्ष भेटून गुलाब पुष्प देवून संजयबाबा घाटगे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास आनंदा साठे,एस.व्ही.पाटील,सुरेश सोनगेकर, डॉ.संजय चिंदगे,बाबुराव भोसले,एम.के. पाटील,युवराज कोईगडे,भैरू कोराणे, अशोक पाटील, किरण पाटील, संजय सुतार,बाजीराव पाटील,धोंडिराम एकशिंगे,शहाजी तांबेकर ,दिलीप कडवे,अरूण पोवार,ओंकार कौंदाडे,के.बी.वाडकर,आकाराम बचाटे,साताप्पा परबकर आदी कार्यकर्ते उपस्थीत होते.

# बालकलाकारांच्या विविध गुणदर्शनाचा तारे जमीन पर जल्लोषात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता पुणे/ पंकज भंडारी**

वसुंधरा परिवार ग्रुप, समृद्धी ग्रुप व रिलायन्स मॉल यांच्या संयुक्त विद्यमाने बाल कलाकारांच्या विविध गुणदर्शनाचा "तारे जमीन पर" हा कार्यक्रम रिलायन्स मॉल एरंडवना येथे आयोजित केला होता. या कार्यक्रमात 37 बाल कलाकार तारकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. वसुंधरा परिवार ग्रुपच्या संस्थापिका योगिता गोसावी नेहमीच बाल कलाकारांच्या कला गुणांना वाव मिळावा व एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध व्हावे म्हणून बालकलाकारांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करत असतात. सर्वात महत्वाचे कोणतीही स्पर्धा आयोजित न करता सहभागी सर्व मुलांना ट्रॉफी देऊन सन्मानित करतात त्यांच्या कलेचे कौतुक करून प्रोत्साहन देतात त्यामुळे मुलांचा कॉन्फिडन्स वाढतो स्टेज डेअरिंग वाढते. या कार्यक्रमाबद्दल विचारले असता योगिता गोसावी यांनी सांगितले की शिक्षण तर महत्वाचे आहेच पण त्याचबरोबर कलागुण विकसित करणे पण तितकेच महत्वाचे आहे आणि म्हणूनच पालकांनी आपल्या मुलांचे कलागुण ओळखून त्यांना प्रोत्साहन द्यावे. मुलांना त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडू द्यावे तरच ते यशस्वी होतील. तारे जमीन पर या कार्यक्रमाची सुरवात मिलन ताई पवार यांनी मान्यवरांना व्यासपीठावर आमंत्रित करून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची घोषणा देऊन करण्यात आली. या कार्यक्रमात सर्व बाल कलाकारांनी विविध प्रकारचे नृत्य, गायन व नाट्यछटा यांचे सादरीकरण केले. लाठीकाठी, भरतनाट्यम, कथ्थक, गोंधळ, साऊथ इंडियन, वेस्टर्न, इंडो वेस्टर्न अशा विविध नृत्यांचे अप्रतिम सादरीकरण करून सर्व रसिकांना मंत्रमुग्ध केले. संपूर्ण वातावरण आनंदमय व जल्लोषमय झाले होते. प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध उद्योजक राहुलजी भोसले, सुप्रसिद्ध अभिनेत्री संस्कृती बालगुडे यांची आई संजीवनीताई बालगुडे, डान्स कोरिओग्राफर रत्नाकर शेळके, फिल्म डिरेक्टर शैलेंद्र निर्मळे, नाटक निर्माते जयंत तायकुंदे, अखिलेशजी राजगुरू गुरुजी, सामाजिक कार्यकर्ते श्यामजी पुणेकर व मिलनताई पवार, किडोज स्कुलच्या संस्थापिका किर्ती कोकाटे, माहेश्वरी स्कूलच्या संस्थापिका शमिका पवार, मंगेश गांधी, गेस्ट डान्सर सुनील ढावरे या मान्यवरांच्या हस्ते बाल कलाकारांना गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. समृद्धी ग्रुपचे ओनर नितीन मोरे व सुनील निकम यांच्या संकल्पनेतून मुलांनी सुट्टीत वाचन करावे व छत्रपती शिवाजी महाराज




यांचा इतिहास समजावा म्हणून शिवाजी कोण होता? हे पुस्तक सर्वांना देण्यात आले. या कार्यक्रमासाठी रिलायन्स मॉल व मॅनेजर प्रतीक सर यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलन पवार यांनी केले व कार्यक्रमाचे आयोजन योगिता गोसावी, नितीन मोरे व सुनील निकम यांनी केले.

# ॲड..प्रकाश आंबेडकर, रेखाताई ठाकूर यांच्या उपस्थितीत २५ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज भरणार-अशोक हिंगे

वादळवार्ता/बीड

वंचित बहुजन आघाडी ने प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण केला आहे बीड, गेवराई, माजलगाव, परळी,अंबेजोगाई,केज,आष्टी, पाटोदा शिरूर आदी ठिकाणी मतदाराच्या भेटी घेतल्या ठिकठिकाणी उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून नको महायुती नको महाविकास आघाडी आता हवी वंचिताची वंचित बहुजन आघाडी असे मतदार बोलून दाखवत आहेत त्यामुळे लोकसभा निवडणुकी मीच विजय होणार हे मात्र निश्चित आहे.मोठे शक्ती प्रदर्शन करत आपण गुरुवार दिनांक २५ एप्रिल २०२४ रोजी अँड. प्रकाश आंबेडकर, रेखाताई ठाकूर ,राज्य प्रवक्ते फारूक अहमद,राज्य उपाध्यक्ष प्रा किसन चव्हाण, प्रा.विष्णु जाधव ,अरून आबा जाधव व सर्व जिल्हा पदाधिकारी यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहोत अशी माहिती अशोक हिंगे यांनी सांगितली . पुढे बोलताना हिंगे म्हणाले की महाराष्ट्र सरकारने व केंद्रातील सरकारने जनते ला महागाई च्या खाईत लोटले आहे तर आरक्षणाच्या नावाखाली सर्वच समजला झुलवत ठेवण्याचे काम केले आहे महायुती, महाविकास आघाडी हे दोन्ही एकाच नाण्याच्या बाजू आहेत म्हणून जनतेने यांना सत्ते पासून दूर ठेवण्याचा निश्चिय केला आहे व वंचित बहुजन आघाडीला पाठींबा मिळत आहे त्यामुळे माझा विजय







निश्चित असल्याचे अशोक हिंगे यांनी सांगितले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पायी रॅलीने दिं २५/४/२०२४रोजी उमेदवारी अर्ज दाखल करून समारोप पारस नगरी शासकीय विश्रामगृहाच्या मागे होईल तरी मतदार बंधु भिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन आशीर्वाद द्यावेत अशी विंनती अशोक हिंगे यांनी केली आहे.

# जाती पाती च नाही तर विकासाच राजकारण करणा-या वंचित बहुजन आघाडीला निवडून द्या- अशोक हिंगे




वादळवार्ता/बीड

जाती पाती च नाही तर विकासा च राजकारण करणाऱ्या वंचित सोशिताच्या कमी येणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला निवडून द्या असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले ते वडवणी नेकनूर प्रचार सभेत बोलत होते

महाराष्ट्र मध्ये सर्वत्र जाती पातीच्या राजकारण चालू आहे विकासाच्या मुद्द्यावर कोणीही बोलत नाही मागे मोठ्या प्रमाणात वाढले आहे हे मुद्दे सोडून जातीपातीचा राजकारण करून पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न माहिती महाविकास आघाडी कडून केला जात आहे मात्र डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे वंशज असलेले प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी सतत वंचित शोषितांच्या प्रश्नावर काम करत आले आहे देशातील मोदी सरकारने एकीकडे महागाई वाढवली आहे त्यामुळे गोरगरीब जनतेचे जीवन जगणे मुश्किल झाले आहे कांद्यावर निर्यात बंदी घालून शेतकऱ्याला अडचणी टाकल्या गेली अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यातील रेल्वे चा प्रश्न पडला आहे जिल्ह्यातील तरुणांना नोकऱ्या नाहीत हे काम आतापर्यंतच्या खासदाराने का केले नाही असा प्रश्न उपस्थित करत माहायुती, महाविकास आघाडी हे फक्त जातीचे राजकारण करतात असे सांगत विकासाचे राजकारण करणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला निवडून द्या आसे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले आहे वडवणी व नेकनुर येथे मतदारातून अशोक हिंगे यांचे जोरदार स्वागत करण्यात आलेवंचित बहुजन आघाडीचे लोकसभा उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा आज नेकनुर येथे संपर्क दौरा यावेळी त्यांचे स्वागत व सत्कार केले. यामध्ये भीमराव पायाळ हर्षवर्धन गडशिंगे अशोक विद्याधर युवराज पायाळ धनराज पायाळ मनोज पायाळ स्वप्निल पवार रोशन दिवार अतुल धनवे लक्ष्मण रोशन धनवे यांच्यासह पंचकोशीतील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते

# रविवारी 'वोट फॉर सायक्लोथॉन'




**वादळवार्ता/बीड**

'सायकल चालवा आरोग्यासाठी, मतदान करा लोकशाहीसाठी' या उक्तीप्रमाणे रविवारी दिनांक २८ एप्रिल रोजी बीड जिल्ह्यात 'वोट फॉर सायक्लोथॉन' हा विशेष उपक्रम मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी राबविला जाणार आहे. सोमवार दि.१३ मे, २०२४ रोजी ३९ बीड लोकसभा मतदार संघात मतदान होणार आहे. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्ह्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अंतर्गतच आज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात 'वोट फॉर सायक्लोथॉन' उपक्रमाविषयीची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, स्विपचे नोडेल अधिकारी डॉ. विक्रम सारूक यांच्यासह जिल्ह्यातील विविध सायकल क्लबचे पदाधिकारी व सदस्य तसेच पोलीस, महिला, डॉक्टर, जिल्हा परिषद, महसूल सायकल संघटनेचे सदस्य उपस्थित होते. रविवारी दिनांक २८ एप्रिल सकाळी सात वाजता छत्रपती संभाजी क्रीडा संकुल (मल्टीपर्पस ग्राउंड) येथून सायक्लोथॉनला सुरूवात होईल. बीड शहरातील मुख्य रस्त्यावरून किमान दहा किलोमीटर सायकल चालवून मतदारांना मतदान करण्यासाठी जागरुकता निर्माण केली जाईल.

या सायक्लोथॉन मध्ये बीड मधील मतदार नागरिक स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊ शकतात. पांढरा टी-शर्ट व काळी पॅन्ट घालून या मॅरेथॉनचा हिस्सा होऊन 'मी मतदान करणार असा संदेश मतदारांनी द्यावा', असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी यावेळी केले.

मुद्रित तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातील पत्रकारांनी, माध्यमकर्मीनीही या सायक्लोथॉनमध्ये सहभाग नोंदवून मतदारांना मतदानासाठी जागरुक करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# नाशिक लोकसभा मतदारसंघातून मा. छगनराव भुजबळ यांना उमेदवारी नाकारून ओबीसी समाजावर सरकारकडून अन्याय- प्रा.विजय मुंडे

## सकल ओबीसी समाज व ओबीसी बहुजन पार्टीच्या वतीने लक्ष्मीबाई राणी टॉवर येथे जाहीर निषेध; परळी तालुक्यातील ओबीसी समाज आक्रमक!

**वादळवार्ता/परळी वैजनाथ**

ओबीसी आरक्षणासाठी आपल्या जीवाची बाजी लावून कसलेही तमा न बाळगता प्रस्थापितांना ज्यांनी विरोध दर्शवला आणि ओबीसी आरक्षणाचा बचाव केला असा ओबीसीचा ढाण्या वाघ महाराष्ट्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री माननीय छगन भुजबळ साहेब यांचे नाशिक लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी नाकारून सरकारने ओबीसीवर अन्याय केला आहे तसेच उमेदवारी न दिल्याने याचा जाहीर निषेध ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.टी.पी.मुंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसी बहुजन पार्टीचे मराठवाडा अध्यक्ष भीमराव मुंडे, जिल्हाध्यक्ष विनायकराव गडदे, तालुकाध्यक्ष सूर्यकांत मुंडे, ओबीसी नेते विलास ताटे, गोपाळ तांदळे ,युवा नेते प्रा. विजय मुंडे यांनी व्यक्त केला.

परळी येथील राणी लक्ष्मीबाई टॉवर या ठिकाणी ओबीसी समाजाने निषेध व्यक्त केला. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि देशाचे गृहमंत्री अमितजी शहा यांनी उमेदवारी देण्यासंदर्भात राज्यातील महायुती सरकारला सुचित केले होते परंतु येथील जातीयवादी सरकारने त्यांची उमेदवारी नाकारली. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेऊन नाशिक लोकसभा मतदारसंघातून माघार घेत असल्याचे सांगितले. उमेदवारी नाकारण्यात कोणाचा हात आहे कोणाच्या सांगण्यावरून सरकारने असे केले असे ओबीसी समाज बोलत आहे. राज्यात ओबीसी समाजाच्या अठरापगड जाती भटक्या विमुक्त जमाती आलूतेदार बलुतेदार यांचे नेते माननीय छगन भुजबळ साहेब आहेत. राज्यातील हा समाज संपूर्णपणे भुजबळ साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. परळी तालुक्यातील ओबीसी समाज हा आक्रमक झाला असून ओबीसी समाज लोकसभा निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवून दिल्याशिवाय स्वस्त बसणार नाही. आपल्या नेत्याला उमेदवारी न मिळाल्याने त्याचा निषेध व्यक्त करीत आहे. भुजबळ साहेब जो निर्णय घेतील तो ओबीसी समाज मान्य करेल असा निर्धार ओबीसी समाजाने यावेळी व्यक्त केला.

यावेळी प्रा.नरहरी काकडे, तालुका उपाध्यक्ष माणिक सलगर, ओमप्रकाश सारडा, श्यामराव गडेकर,रघुनाथ डोळस, रामकिसन घाडगे,मुरलीधर महाराज गडदे, जम्मू सेठ, मुक्तार भाई, ताराचंद फड, प्रभाकर गवळी, राहुल कांदे,शिवा बडे, सोमनाथ आघाव, महादेव दौंड, हनुमंत जाधव, मिलिंद क्षीरसागर, शंकर बनसोडे, एन.डी. वाघमारे, दशरथ लोखंडे, गोपीनाथ लोखंडे, शिवाजीराव आढाव माळी, शिवा चिखले, इंद्रजीत आघाव, संजीव बारस्कर, बिट्टू रोडे,शिवा जाधव,बंडू पोटभरे,अनंत महाराज मुंडे आदीसह ओबीसी समाजातील विविध संघटनांचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )